N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** पाथर्डी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0826 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2025 11:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 31/07/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/07/2025
   **Time From (वेळेपासून):** 18:21 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/08/2025 **Time (वेळ):** 09:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2025 10:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 25 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पारेवाडी, तापाथर्डी, जिअहिल्,पाथर्डी, जिअहिल्यानगर,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शुभम सुनिल आठरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पारेवाडी, तापाथर्डी, जिअहिल्,पाथर्डी, जिअहिल्यानगर,पाथर्डी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पारेवाडी, तापाथर्डी, जिअहिल्,पाथर्डी, जिअहिल्यानगर,पाथर्डी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9146424954

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश रखमाजी धरम | | | 1. मिरी, तापाथर्डी, जि अहिल्यान, पाथर्डी, जि अहिल्यान,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अक्षय सुभाश घोरपडे | | | 1. षिंगवे केषव, ता पाथर्डी, जिअ, पाथर्डी, जिअहिल्यानगर,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 01/08/2025

मी शुभम सुनिल आठरे, वय 26 वर्शे, धंदा षेती, रा. पारेवाडी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर, मो.नं. 9146424954.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.31/07/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र.वि. अहिल्यानगर यांचेषी संपर्क करुन लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि. 31/07/2025 रोजी 11/30 वा. चे सुमारास कारार पिंपळगाव, ता.पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 11/45 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे षासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी षासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, ''माझे वडिल श्री. सुनिल लक्ष्मण आठरे यांचे नावे मौजे पारेवाडी, ता.पाथर्डी येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर झाले आहे. त्याचा आ ॅनलाईन मंजुरी क्रमांक एमएच 127367044 असा आहे. सध्या सदर घरकुलाचा पाया भरण्याचे कामकाज चालु आहे. घरकुलाच्या पायाभरणीकरीता लागणारा मुरुम व जाडसर वाळुच्या दोन गाडया आम्ही आमचे गावचे नदीपात्रातुन आणुन घरकुलाचे बांधकामाच्या ठिकाणी खाली केलेल्या होत्या. सदर मुरूम व वाळु नदीतुन भरण्याकरीता माझे चुलत चुलते श्री. संदिप आसाराम आठरे यांची जेसीबी व वाहतुकीकरीता माझा मित्र सोमा गोर्डे आणि नितीन लोमटे यांचा ढंपरचा वापर करण्यात आला होता. सदरची वाहने ही मोकळया स्थितीत रोडवर उभी करण्यात आलेली होती. दि.30/07/2025 रोजी रात्री 11ः:00 वाजेदरम्यान आडगाव सजेचे तलाठी श्री. सतीश धरम व नायब तहसिलदार श्री. सानप साहेब हे आमचे घरकुलाजवळ आले. त्यांनी मुरूम व जाडसर वाळुचे ढिग पाहिले व सदर मुरूम आणि वाळु ही बाजुस उभ्या असलेल्या जेसीबी व ढंपर या वाहनंानी वाहतुक केली आहे, ही अवैध गौणखनिज वाहतुक आहे, तुमच्या वाहनांवर व मुरूमांच्या ढिगांवर अवैध गौणखनिज वाहतुकी संबंधाने कारवाई करणार आहोत असे म्हणाले. मी त्यांना आम्ही अवैध गौणखनिज वाहतुक करत नसल्याचे सांगितले. त्यावेळी तलाठी श्री. धरम मला बाजुला घेवुन म्हणाले की ' तुमच्या वाहनांवर व तुमच्यावर अवैध गौणखनिज वाहतुकीसंबंधाने कारवाई होवु दयायची नसेल तर नायब तहसिलदार श्री. सानप साहेबांना व मला 1,00,000/-रुपये दयावे लागतील' असे म्हणाले. मी त्यंाना आमच्याकडे एवढे पैसे नाहीत, असे म्हणालो असता तलाठी धरम यांनी कमीत कमी 50,000/-रूपये तरी दयावेच लागतील असे म्हणुन वाहनांवर व घरकुलासाठी आणलेल्या मुरूमाच्या ढिगांवर अवैध गौणखनिज संबंधाने कारवाई न करण्याच्या मोबदल्यात 50,000/-रुपये लाचेची मागणी केली. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. आज दि. 31/07/2025 रोजी मी तलाठी श्री. धरम यांची भेट घेणार आहे व आमचे वाहनांवरील कारवाई संदर्भाने चर्चा करणार आहे. त्यावेळी तलाठी धरम यांनी त्यांचेकरीता व नायब तहसिलदार श्री. सानप साहेब यांचेकरीता म्हणुन आमच्या वाहनांवर व घरकुलासाठी आणलेल्या मुरूमाच्या ढिगांवर अवैध गौणखनिज संबंधाने कारवाई न करण्याकरीता माझेकडे लाचेची मागणी केल्यास मी त्यांना माझी नायब तहसिलदार श्री. सानप साहेब यांचेषी भेट घालुन देणेबाबत विनंती करणार आहे. तलाठी धरम यांनी माझी भेट नायब तहसिलदार श्री. सानप यांचेषी घालुन दिल्यास मी त्यांचेषी चर्चा करणार आहे, त्यावेळी त्यांनी माझेकडे वरील कारणास्तव लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. माझ्यात व तलाठी श्री. धरम व नायब तहसिलदार श्री. सानप यांचेत कोणत्याही

प्रकारची आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. तलाठी धरम व नायब तहसिलदार सानप यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील. आता मी माझे वडिलांचे नावे घरकुल मंजुर झाले बाबतचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती हजर करत आहे. वगैरे मजकुराची तक्रार सांगीतली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी मला तलाठी धरम हे कोठे भेटतील असे विचारले असता मी त्यांना फोन करून विचारावे लागेल असे म्हणालो. तसेच तलाठी धरम हे फक्त व्हॉट्सअॅप कॉलवरच बोलतात असे सांगितले. त्यानुसार मी माझे मोबाईलमधील व्हॉट्सअॅप वरून तलाठी धरम यांना कॉल केला असता त्यांनी ते नगरला गेले असल्याचे सांगुन, मी कॉल करतो असे सांगितले. सदर संभाशण पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरच्या सहायाने ध्वनीमुद्रीत केले. सदर संभाशणामध्ये तलाठी धरम यांनी मला 'मी कॉल करतो' असे सांगितले परंतु कोठे भेटणार याबाबत सांगितले नाही. त्यानंतर तलाठी धरम यांचे फोनची वाट पाहण्याचे सर्वानुमते ठरले. बराच वेळ झाल्यानंतर सुमारे सव्वासहा वाजेच्या सुमारास माझे चुलत चुलते श्री. संदिप आठरे यांचा मला फोन आला. त्यावेळी त्यांनी कळविले की, तलाठी धरम हे घरकुलाजवळ आले आहेत, त्यांनी बोलविले आहे असे कळविले. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. मी व पंच नं. 1 असे माझेकडील मोटार सायकलने 18/21 वा. रवाना होवुन माझे घरकुलाजवळ गेलो. तेथे रस्त्याच्या कडेला तलाठी धरम हे त्यांचेकडील चारचाकी वाहनात बसलेले होते.मी व पंच नं. 1 त्यांचेजवळ गेलो. पंचांना पाहुन त्यांनी हे कोण आहेत असे विचारले. त्यावर मी त्यांना ते मामा आहेत असे सांगितले. तलाठी धरम यांनी त्यांना बाजुला जावुन उभे राहण्याचे सांगितले. त्याप्रमाणे पंच नं. 1 असे थोडया अंतरावर जावुन उभे राहिले. तलाठी धरम यांचेत व माझेत वाहनांवरील कारवाई संबंधाने व घरकुलाच्या पायाभरणीसाठीच्या मुरूमाबाबत चर्चा झाली. त्यांनी मला ''तुमचा जो विशय आहे तो वन टाईम मिटवुन टाक, बघ आणि संाग लवकर, माझा यात काही संबंध नाही, हा त्यांचा विशय आहे, असे म्हणाले असता मी त्यांना तुम्ही सांगा एकदा असे म्हणालो. त्यावर त्यांनी नाराज होवु नका, मला तोंडावर नका पाडु असे म्हणाले. मी त्यांना सांगा तुम्ही असे म्हणालो असता ते मला '' सांगत नाही बसत, तुलाच काय दयायचे ते दे, '' असे म्हणाले. तलाठी धरम यांनी मला अवैध गौणखनिज वाहतुकीबाबतचा षासनाचा जीआर दाखविला. त्यानंतर आमचेत बराच वेळ माझे कामाबाबत चर्चा झाली. मी त्यांना रात्री तुम्ही होते म्हणुन ओळखले, एकटे सानप साहेब असते तर ओळखले नसते असे म्हणालो. त्यावर त्यांनी लाल दिवा असतो त्यांच्या गाडीत असे म्हणाले. मी त्यांना तुम्ही सांगा असे विचारले असता त्यांनी ''सगळ काल झाल्यानंतर आज कषाला बोलायला लावतो, हा नाही म्हणायचं मग तुम्हीच, त्यांच्यासमोर बोलनं झाल ना दादा '' असे म्हणाले. मी त्यांना थोडयावेळानी येतो, आणखी पैषांची तडजोड करावी लागणार आहे असे म्हणालो असता त्यावर ते आजच्या आज मिटवुन टाक, फिनीष कर असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 18ः50 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले असता तलाठी धरम यांनी आमचे वाहनांवर कारवाई न करण्याकरीता त्यांचे करीता व नायब तहसिलदार सानप यांचेकरीता काल ठरल्याप्रमाणे म्हणजे 50,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर मी लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी माझ्या बचतीतुन 50,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 100 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या खिषात ठेवुन दिली. पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इषारा ठरवुन दिला. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यंानी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. तलाठी धरम यांना भेटण्याचे ठिकाण निष्चित करण्याकरीता मी माझे मोबाईलमधिल व्हॉट्सअॅपमधुन तलाठी धरम यांना स्पिकर चालु करून फोन केला व कोठे येवु असे विचारले असता त्यांनी मिरीला येतो का असे

विचारले त्यावर मी येतो असे म्हणालो. त्यावर त्यांनी एकटाच येतो ना असे विचारले असता मी त्यांना एकटाच येतो असे सांगितले. मी मिरीला कुठे येवु असे विचारले असता त्यांनी सदरचे संभाषण पोका ॅ निमसे यांनी रेका ॅर्डरमध्ये रेका ॅर्ड केले. त्यानंतर तलाठी धरम यांचेविरुध्द मिरी गावातील विरभद्र मंदिर येथे सापळा लावण्याचे ठरले. पोका ॅ निमसे यांनी व्हा ॅईस रेका ॅर्डर चालु करुन माझे ताब्यात दिले. मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकी मोटार सायकलने रवाना केले. आमचे पाठोपाठ श्री. त्रिपुटे व सापळा पथक षासकिय वाहनाने रवाना झाले. आम्ही सर्वजण मिरी गावातील विरभद्र मंदीराजवळ आलो. सर्वजण सदर मंदिराच्या परीसरात कोणास संषय येणार नाही अषा पध्दतीने सापळा लावुन थांबले. मी तलाठी धरम यांना व्हा ॅट्सअ ॅपव्दारे फोन केला असता त्यांनी मला त्यांचे बंगल्यात यायला सांगितले. त्यांनी मला एकट्यालाच यायला सांगितले होते त्याप्रमाणे मी एकटाच चालत तलाठी धरम यांच्या बंगल्याच्या लोखंडीगेटने आत गेलो. पंच नं. 1 सदर बंगल्याच्या बाहेर मी व तलाठी धरम दिसेल अषा अंतरावर थांबुन होते. थोडया वेळाने तलाठी धरम हे मला व त्यांचे एका मित्रास त्यांचे चारचाकी गाडीत घेवुन माका, ता.पाथर्डी या रोडने घेवुन गेले. वाटेत त्यांनी मला लाचेची रक्कम त्यांचे वाहनाचे समोरील बा ॅक्समध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदरची रक्कम त्यांचे वाहनाचे समोरील बा ॅक्समध्ये ठेवली. त्यानंतर थोडे पुढे जावुन त्यांनी मला व त्यांचे मित्रास वाटेत गाडी उभी करून गाडीतुन उतरण्यास सांगितले व थोडया वेळात येतो म्हणुन सांगितले. आम्ही गाडीतुन उतरून थांबुन राहिलो. थोडया वेळात तलाठी धरम हे त्यांचे वाहनाने आले. त्यानंतर आम्हाला त्यांनी त्यांचे वाहनात बसवुन पुन्हा त्यांचे बंगल्यात आणले. तेथे त्यांनी सदरची रक्कम गाडीतुन काढुन त्यातील दहा हजाराची रक्कम माझेकडे परत दिली व उर्वरित 40,000/-रुपये रक्कम तेथे उपस्थित एका इसमाकडे दिली. सदरची रक्कम त्या इसमाने त्याचे पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, सापळा पथक, पंच क्र. 1 व पंच क्र.2 असे आले, पोका ॅ निमसे यांनी व्हा ॅईस रेका ॅर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे साहेबांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता मी समोर खुर्चीत बसलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हे तलाठी धरम आहेत. त्यांनी लाच रक्कम स्विकारून शेजारी असलेल्या इसमाकडे दिली असता सदर इसमाने ती रक्कम त्याच्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने खाजगी इसमाकडील 40,000/-रुपये व तलाठी धरम यांनी मला परत दिलेली रक्कम 10,000/-रुपये अषी एकुण 50,000/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. सोबतच्या कर्मचाÚयांच्या मदतीने तलाठी धरम यांना ताब्यात घेतले. श्री. त्रिपुटे यांनी तलाठी धरम यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सतिश रखमाजी धरम, वय 40 वर्षे, धंदा नोकरी, तलाठी सजा आडगाव, अति. चार्ज तिसगाव सजा, ता.पाथर्डी, जि. अहिल्यानगर, रा. मिरी, ता.पाथर्डी, जि. अहिल्यानगर असे सांगितले. श्री. त्रिपुटे यांनी लाच रक्कम स्विकारलेल्या खाजगी इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अक्षय सुभाश घोरपडे, वय 27 वर्षे, धंदा षेती, (खाजगी इसम) रा. षिंगवे केषव, ता. पाथर्डी, जि.अहिल्यानगर असे सांगितले. लाचेच्या नोटांच्या नंबरची खात्री करण्यात आली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी मला थोडे बाजुला बाहेर उभे राहण्यास सांगीतले, तलाठी धरम यांच्या घराच्या एका खोलीत त्यांच्या व खाजगी इसम घोरपडे यांच्या तपासण्या केल्या. त्यानंतर मला बोलवुन माझ्या हाताच्या व पॅन्टच्या खिषाच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर तलाठी धरम व खाजगी इसम घोरपडे यांना ताब्यात घेवुन श्री. त्रिपुटे व सापळा पथक अहिल्यानगरकडे निघाले. मला श्री.त्रिपुटे यांनी षासकिय वाहनाचे पाठोपाठ ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी ला.प्र.वि. कार्यालयात आलो. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 31/07/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 18/21 ते 18/50 वा. दरम्यान तलाठी सतीश धरम यांनी माझेकडे आमच्या वाहनांवर व घरकुलासाठी आणलेल्या मुरुमाच्या ढिगांवर अवैध गौणखनिज संबंधाने कारवाई न करण्याकरीता त्यांचे स्वतःकरीता व नायब तहसिलदार श्री. सानप, तहसिल कार्यालय, पाथर्डी यांचेकरीता काल ठरल्याप्रमाणे म्हणजे 50,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम तलाठी धरम यांनी लाचेचा सापळा कारवाई वेळी 20/46 ते 22/09 वा. दरम्यान माझेकडुन त्यांचे वाहनात स्विकारली व सदरची रक्कम त्यांचे घरात उपस्थित असलेले खाजगी इसम अक्षय घोरपडे यांचेकडे दिली. घोरपडे यांनी सदरची रक्कम त्यांचे नेसते पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. म्हणुन माझी 1) सतिश रखमाजी धरम, वय 40 वर्षे, धंदा नोकरी, तलाठी सजा आडगाव, अति. चार्ज तिसगाव सजा, ता.पाथर्डी, जि. अहिल्यानगर, रा. मिरी, ता. पाथर्डी, जि., अहिल्यानगर, 2) आरोपी खाजगी इसम अक्षय सुभाश घोरपडे, वय 27 वर्षे, धंदा षेती, रा. षिंगवे केषव, ता. पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pujari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vilas sahadu pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन